# UGC Journal Details

| | |
|---|---|
| **Name of the Journal :** | Research Journey |
| **ISSN Number :** | |
| **e-ISSN Number :** | 23487143 |
| **Source:** | UNIV |
| **Subject:** | Marathi |
| **Publisher:** | Swatidhan International Publication |
| **Country of Publication:** | India |
| **Broad Subject Category:** | Multidisciplinary |

Print

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all
(https://www.ugc.ac.in/) (https://www.ugc.ac.in/faq.aspx)
RTI (https://www.ugc.ac.in/subpage/RTI-Act.aspx)
Tenders (https://www.ugc.ac.in/Tenders.aspx)
Jobs (https://www.ugc.ac.in/ugc_jobs.aspx)
Press Release (https://www.ugc.ac.in/ugc_pressrelease.aspx)
Contact Us (https://www.ugc.ac.in/contact.aspx) अ (https://www.ugc.ac.in/hindi/)

# UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for r

**Total Journals : 1436**

Show 25 entries Search: Research journey

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=) | 1168 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=) | 1220 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

## For UGC Officials

- e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)
- NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)
- RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)
- PG portal (https://pgportal.gov.in)

KVN Naik Arts, Commerce & Science College IQAC OFFICE

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117
Special Issue 18 'पर्यावरण संरक्षण - संवर्धन : विविध आयाम'
ISSN : 2348-7143
August 2017

# पर्यावरण संवर्धनात साहित्याचा सहभाग

**डॉ. पौर्णिमा बोडके**
मराठी विभाग प्रमुख
के.व्ही.एन.नाईक महाविद्यालय,नाशिक

**प्रस्तावना :**

मानवाची निर्मितीच जर निसर्गाने केलेली आहे तर मानवाला निसर्गापासून वेगळे कसे करता येईल. खर तर निसर्गातील घटकांना वेगळे रूप देऊन आपण त्याचा पुरेपूर उपभोग घेत असतो. म्हणून सर्व गोष्टी निसर्गाच्याच मालकीच्या आहेत हे आपण विसरता कामा नये. निसर्गाचे चक्र हे मानवी अडथळे व आघातांमुळे बिघडले आहे; हे चक्र अव्याहतपणे फिरत राहावे त्यासाठी आपणच जागृत व्हायला हवे. वसुंधरेला विनाश्याकडे घेऊन जाण्याचा आपल्याला काय हक्क आहे? निसर्ग म्हणजे आपले अस्तित्व. आपली संस्कृती ही मातृत्वाचे धडे देणारी आणि मातेचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य असल्याची जाणीव करून देणारी आहे. स्वाभाविकपणे आपले साहित्य ही देखील ह्याच प्रयोजनार्थ निर्माण केले जाते. तेव्हा साहित्यातून पर्यावरणाचे संवर्धन साधने ही प्रत्येक लेखकाची भूमिका असते; मांडणी कदाचित भिन्न असू शकते. जसे प्राचीन काळातील साहित्य निर्मितीत निसर्ग ईश्वराचे रूप मानून पुजा आराधांनेतून निसर्ग व मानव यांचे परस्पर सहसंबंध जनमाणसापर्यंत पोहचविन्याचे साधन म्हणजे साहित्य होय॰

**पर्यावरणातील संतुलनाचे महत्व**

असंतुलित पर्यावरण म्हणजे अनेक आपत्तीना निमंत्रण होय. उदा. अवर्षण, रोगराई, पशुपक्षांची हानी कारण वृक्ष वेलिंची वानवा, वैश्विक उष्म्याची लाट या सर्व बाबी आपणाला नक्कीच विचारात पाडतात. त्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण ही चळवळ सर्व लोकांची चळवळ असल्याने त्यात साहित्यिकांची भूमिका अधिक महत्वाची आहे हे सर्व मान्य आहे. समाजातील ठराविक लोकांनीच पर्यावरणाची काळजी घ्यावी असे नाही, तरीपण पुढाकार मात्र ठराविक लोकच घेतात. त्यात लेखकांचा नंबर फार वरचा आहे; कारण जनमत परिवर्तन करणे हे साहित्य साधनेतून त्यांना सहज जमते हे साहित्याचा इतिहास दाखवून देतो आहे. मग ती राजकीय किंवा सामाजिक क्रांति होवो की वैचारिक बदल; ते पुस्तकाने शक्य झालेले आहेत.

**निसर्ग संवर्धनार्थ साहित्य**

आपल्या सभोवताली किंवा पृथ्वीवर सर्वत्र झाडे, पशू, पक्षी, डोंगर, नद्या-नाले, तळी, हवा, हवामान, इत्यादि अनेक नैसर्गिक घटकांच्या मिळून आपण निसर्ग अजमावतो. मानवाप्रमाणे ही सजीवसृष्टी जोपासणे आपल्या सर्वांच्या हिताचे आहे हे सर्वांना माहीत आहे. पण कृती करण्यापेक्षा पोकळ आश्वासणे देत बसण्यात काही अर्था नाही. ज्ञान व तंत्रज्ञानाच्या बळावर पर्यावरणाला घातक व विध्वंस करणारे प्रयोग केले जात आहेत. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर पर्यावरण संतुलन राखले जात नाही हीच खंत आहे. परिणामतः निसर्गाचा कोप मानवाला सहन करावा लागत आहे.

शासकीय पातळीवरून या बाबतीत जाणीव करून देण्यासाठी २२ एप्रिल 'वसुंधरा दिन', ६ जुलै 'वनमहोत्सव' यासारखे उपक्रम सुरू करून प्रत्येकाला निसर्ग संवर्धनात सहभागी करून घेतले आहे. वृक्षारोपण हा रामबाण उपाय आहेच पण त्याबरोबर वाढणारी लोकसंख्या, कारखानदारी, व औद्योगिक विकास यामुळे हवेचे, पाण्याचे व ध्वनीचे प्रदूषण होत आहे. निसर्गाचे ऋतुचक्र अनियमित झालेले आहे; हे सर्व भयंकर चित्र आजचे वास्तव आहे. ते आपण साहित्यात वाचतो. प्रत्येक कवि- लेखक सामाजिक बांधीलकीच्या कर्तव्यातून हे सगळे साकारतो. ही प्रबोधित मंडळी सामाजिक हक्क आणि कर्तव्याची जाणीव

करून देत देत जन मतपरिवर्तन करण्यात यशस्वी ठरतात. त्यामुळे निसर्ग संवर्धनासाठी सामाजिक दृष्टिकोनाबरोबरच भारतीय संस्कृति, धार्मिकता, व नैतिक पातळीवरून केलेले आवाहन जास्त भावते असे दिसते.

**निसर्गाधारीत साहित्य :**

निसर्गाच्या अलौकिक कलासामर्थ्याचे कौतुक करताना अनेक कवींनी त्यातील विविध स्वरूपांचे वर्णन उपमा,रूपकालंकाराचा वापर करून निसर्ग कधी कलाकार, तज्ञ, तत्वज्ञ, उपदेशक, मार्गदर्शक किंवा विध्वंसक सुदधा अश्याप्रकारे साकारलेले आहे. यापेक्षाही सरस म्हणजे निसर्गात विविध देव-देवतांची रुपे न्याहाळलेली दिसतात. त्याशिवाय मानवी समाजातील नातेसंबंध निसर्गातील चराचरात असल्याचे मानले गेले. निसर्ग-मानवाचे दृढ संबंध प्रस्थापित करणारे संत किवा संतकवि व त्यांचे साहित्य आपल्याला ठाऊक आहेच.

संत तुकारामाचे अभंग म्हणजे मानवी सुखाचे सर्व मार्ग निसर्गात आणि निसर्गात देवाचे रूप दाखविणारे आहेत. ते म्हणतात-

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।**

समर्थ रामदास स्वामींनी निसर्गातील अनेकविध वनस्पतिच्या सौंदर्याबरोबर वनौषधी, कंदमुळे, फुलफळांच्या गुणांचे कौतुक करून मानवी जीवनाला सुखकारक निसर्गाची साथ आवश्यक असल्याचे कथित केले आहे.-

**नाना वल्ली मध्ये जीवन | नाना उळी फुली जीवन |**

**नाना कंद मुळी जीवन |गुणकारके ||**

अलीकडच्या काळात कवायत्रि शांता शेळके यांनी निसर्गाची थोरवी गातांना मानव- निसर्गामध्ये एकरूपता असल्याचे नमूद केलेले आहे.-

**मातीच झाड, झाडाची माती**
**माझी पुन्हा माती**
**ह्या पानावरल्या रेखा माझ्या तळहाती |**

RESEARCHJOURNEY

थोर निसर्ग कवि अर्थात बालकवी म्हणजे त्यांचे साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा आणि त्यात संपूर्ण प्रतिबिंब दिसते ते मानवाच्या सर्व घटकांचे. काव्यसृष्टी ही जीवनसृष्टी आणि निसर्ग देवतांचे स्वरूप त्यांच्या काव्यात प्रकट झालेली दिसते. मानवी मनाची भावनिकता टिकविण्यासाठी, त्यांची संवेदंशीलता टिकविण्यासाठी निसर्गाची रमणीयता टिकवायला हवी. बाल कवींनी निसर्गाची व मानवाची मैत्री घट्ट असल्याचे सांगून एकमेकांच्या सह अस्तित्वाची व सान्निध्याची नवी ओळख करून दिलेली आहे. साहित्य हे निसर्गाच्या सान्निध्यात फुलते तर कवि मनाचा फुलोरा हा निसर्गाच्या सोबतीत बहरतो. अश्या निसर्गाचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. निसर्गावर प्रेम करा; अन्यथा भविषी काळ सुखकर राहणार नाही.

पर्यावरण प्रेमी साहित्य संमेलने

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पहिले पर्यावरण प्रेमी साहित्य समेलन पुण्यात बाल गंधर्व कला दालनात सुप्रसिद्ध कवि ना. धो. महानोर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्याचा वृतांत असा की निसर्गाच्या कविता, शेतकरी जीवन, व परिसर याविषयी परिसंवाद झाला. त्यानंतरचे संमेलने डॉ. अनिल अवचट, हेमा साने, डॉ. रामचंद्र देखणे या सारख्या महान लेखकांच्या अध्यक्षतेखाली झालीत. थोडक्यात, येथे साहित्याचा पर्यावरणाशी असलेला संबंध, निसर्ग प्रेम आणि आपले आनंदी जीवनाचे रहश्य या सर्व बाबीवर परिसंवाद आणि काव्यवाचन झाले. त्याचा परिणाम असा की सर्वत्र प्रसार होऊन पर्यावरण जागृती कार्यक्रमाला गती मिळाली.

ISSN : 2348-7143 August 2017

तपशिलात सांगायचे तर कवि महानोरांची कविता, काव्य, व चित्रपट गीते यामध्ये निसर्गविषयीची ओढ लागावी असा आशय आणि सौंदर्याची पेरणी केलेली आहे. उदा. 'जैत रे जैत' या चित्रपटात आदिवासी ठाकर जमातीची जीवन कहाणी व मानसिक निश्चय व जिद्द दाखविताना त्यांच्या गीतातून जो उत्साह आणि उद्‌दुकता संचारते ते साहित्याचा प्रभाव देतात. त्यांच्या काव्यसंग्राहाबद्दल बोलायचे तर ते निसरर्गाहून वेगळे करणे अवघड. 'अजिंठा,' 'गंगा वाहू दे निर्मळ,' 'पळसखेडची गाणी,' 'पांनझड,' 'पावसाळी कविता,' 'रानातल्या कविता,' 'शेती, आत्मनाश व संजीवन,' इत्यादि काव्यसंग्रह हे सर्व उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

मराठी ग्रामीण साहित्याचा विचार निसर्ग आणि पर्यावणाचे महत्व यापेक्षा करूच शकत नाही. ग्रामीण साहित्य म्हणजे कृषिनिष्ट जाणिवा आणि कलात्मक जाणिवांचा उत्कृष्ट आविष्कार होय. सीसाहित्यातून ग्रामनिष्ठ जाणिवा जागृती व्यक्त होतात. नवशिक्षित तरुणांना शेतीविषयी आवड आणि नाव तंत्रज्ञानाबरोबर पर्यावरणाचे संरक्षण करावे असा संदेश दिला जातो. शहराजवळील खेडी झपाट्याने बदलत आहेत आणि निसर्गाचे संतुलन बिघडत आहे. उदा. शकर पाटलाची कथा निसर्गाचे सौंदर्य आणि मानवाचा उद्धारक अशी निसर्गाची भूमिका दाखवितात. डॉ. नागनाथ कोतापल्ले, भास्कर चंदनशिव, रा.रं. बोराडे, द.ता.भोसले यांच्या कथा, कादंबरी, कविता यामधुन कृषिकार्य व कृषिसंस्कृती याविषयी सहानुभूतिपूर्वक विचार मांडून वाचकाला शेतीविषयी आणि एकूणच परिसराबद्दल जिव्हाळा वाटावा असा सुर तेथे लागतो.

आणखी सांगायचे तर आपल्या सण-उत्सवाची वर्णने म्हणजे आपली संस्कृती, भाषा, परिसर, जीवनरहाटी, लोकोत्सव, कलासंस्कृती इत्यादि गोष्टींचा आविष्कारच असतो. निसर्गाचे ऋतुचक्र-शेती व्यवसायाची दैनंदिन कामे- मानवी सुख समाधानाचे प्रसंग. उदा. पावसाळा म्हणजे वसंत ऋतु, आणि त्यावेळी वटपौर्णिमा, नागपंचमी, घटस्थापना, पोळा, हरतालिका, होळी व गुढीपाडवा अश्या सणांच्या साजरा करतांना आपण निसर्गाच्या बदलाचा आनंद घेत मानवी समृद्धी आणि धार्मिक उपासना करीत असतो. यांविषयी जे साहित्य किंवा कृती जपल्या जात आहेत ते खरे पर्यावरण जागृती केली जात आहे. पण काही जण त्याचा अतिरेक करून पर्यावरणाला घातक कृत्य करतो. यांविषयी आपण विचार करावा ही विनंती.

**संदर्भ :**

१. मराठी साहित्य संशोधन: नव्या दिशा, डॉ. अविनाश आवलगावकर, नोव्हे. २००६
२. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, डॉ. कोतापल्ले नागनाथ, मेहता पब्लिकेशन, पुणे.
३. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, गारे गोविंद, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. २००२
४. साहित्य, समाज,आणि संस्कृती, पाध्ये दिगंबर, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ,१९९८